ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमासाठी मुख्य संसाधन संस्थांची निवड करण्यासाठी समित्यांची स्थापना करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः स्वभामि २०१९/प्र.क्र. ८०/पापु-१६

७ वा मजला, जी.टी. रूग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ००१.
तारीख: ६ जून, २०१९

वाचा :- शासन निर्णय क्रमांक केआरसी ३६१४/प्र.क्र.१२/पापु ०८, दिनांक १ सप्टेंबर २०१४

प्रस्तावना :-

ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमासाठी मुख्य संसाधन संस्थांची निवड करणेबाबत शासन निर्णय दिनांक १ सप्टेंबर, २०१४ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.सदर शासन निर्णयात मुख्य संसाधन संस्थांच्या निवड प्रक्रियासंबंधी प्रस्ताव छाननी समिती, जिल्हास्तरीय क्षेत्रीय भेट समिती व राज्यस्तरीय निवड समितीचा तपशील परिशिष्ट १ मध्ये जोडला आहे असे नमूद आहे. तथापि, सदर शासन निर्णयासोबत समितीचा तपशिल उपलब्ध नाही. त्यानुषंगाने सदर समित्या गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

उपरोक्त दिनांक १ सप्टेंबर, २०१४ च्या शासन निर्णयात संचालक, वासो यांचेकडे राज्य मुख्य संसाधन संस्थांकरिताचे प्रस्ताव व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे जिल्हा मुख्य संसाधन संस्थांकरिताचे प्रस्ताव सादर करावेत असे नमूद आहे. त्यानुसार राज्य व जिल्हास्तरांवर पुढीलप्रमाणे समित्या गठीत करण्यात येत आहेत.

राज्यस्तरीय छाननी समिती		
क्र.	अधिकारी पदनाम	पदनाम
१.	संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,बेलापूर.	अध्यक्ष
२.	कक्ष अधिकारी, कार्यासन पापु १६	सदस्य
३.	लेखाधिकारी, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,बेलापूर.	सदस्य
४.	मनुष्यबळ विकास सल्लागार, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,बेलापूर.	सदस्य सचिव

जिल्हास्तरीय छाननी समिती		
क्र.	अधिकारी पदनाम	पदनाम
१.	उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद.	अध्यक्ष
२.	समाजशास्त्रज्ञ तज्ञ,जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद.	सदस्य
३.	क्षमता बांधणी तज्ञ, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद.	सदस्य
४.	मनुष्यबळ विकास सल्लागार,जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद.	सदस्य सचिव

जिल्हास्तरीय क्षेत्रीय भेट समिती		
क्र.	अधिकारी पदनाम	पदनाम
१.	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.	अध्यक्ष
२.	उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद.	सदस्य
३.	कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद.	सदस्य
४.	स्वच्छता तज्ञ, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद.	सदस्य सचिव

राज्यस्तरीय निवड समिती		
क्र.	अधिकारी पदनाम	पदनाम
१.	अ.मु.स./प्र.स./सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.	अध्यक्ष
२.	उप सचिव (पापु-१६), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.	सदस्य
३.	संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,बेलापूर.	सदस्य
४.	अवर सचिव, पापु १६, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.	सदस्य
५.	कक्ष अधिकारी, कार्यासन पापु-१६, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.	सदस्य सचिव

समित्यांची कार्यकक्षा:-

१) राज्यस्तरीय छाननी समिती राज्य मुख्य संसाधन संस्थां निवडीबाबतच्या प्रस्तावांची छाननी करुन राज्यस्तरीय निवड समितीस शिफारस करेल.

२) जिल्हास्तरीय छाननी समिती जिल्हा मुख्य संसाधन संस्थां निवडीबाबतच्या प्रस्तावांची छाननी करुन राज्यस्तरीय निवड समितीस शिफारस करेल.

३) राज्यस्तरीय निवड समिती ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमासाठी राज्य व जिल्हा स्तरावरील मुख्य संसाधन संस्थांच्या निवडीसाठी शासनास शिफारस करेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६०६१५११२३९२२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Smita Sachin Rane

Digitally signed by Smita Sachin Rane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f85d92aa99ea42eb86747707e3c3a129af986c1f95f6bc3e8165ceaf5155e6e7, serialNumber=4b9befd340493837db4cffafa6b96eeaf6aa3c12a7a6bf0467b0f517b724e8ee, cn=Smita Sachin Rane
Date: 2019.06.06 18:23:58 +05'30'

(स्मि.स.राणे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव.
२. मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव.
३. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई.
४. उप सचिव तथा प्रकल्प संचालक,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई.
५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
६. जिल्हाधिकारी (सर्व).
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
८. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर नवी मुंबई.
९. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
१०. अवर सचिव पापु-१६, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई.
११. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद.
१२.संग्रहार्थ.